# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# शुक्रवार, दिनांक १४ जून २०२४

## ठळक बातम्या

1. **महात्मा फुले वाडा व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारकांच्या विस्तारासाठी आगामी अर्थसंकल्पात २०० कोटींची तरतुद केली जाणार, जुलै अखेरीस होणार भूमिपूजन - उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती.**
2. **राज्यातील बाराशे ४५ महसुली मंडळात चारा डेपो उभारण्यास शासनाची परवानगी.**
3. **पाच दिवसांच्या वार्षिक हज यात्रेला आजपासून सुरुवात-भारतीय हज समितीने पाठविले १ लाख ४० हजार २० यात्रेकरू.**

**आणि**

4. **मेळघाटातील धारणी तालुक्यातील गर्भवती महिला व बालकाच्या मृत्यूसंबंधी एसआयटीकडून होणार चौकशी.**

*****

महात्मा फुले स्मारक

महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेली भिडेवाडा येथील पहिली मुलींची शाळा येथे राष्ट्रीय स्मारक उभारण्याच्या दृष्टीने आवश्यक ती प्रक्रिया करुन गतीने निविदा प्रक्रिया तातडीने राबवावी असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत दिले. त्यासाठी आगामी अर्थसंकल्पात २०० कोटींची तरतुद करणार असल्याचं अजित पवार यांनी यावेळी सांगितलं. विधानभवन पुणे इथं झालेल्या या बैठकीस विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, यांच्यासह प्रमुख प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. हे स्मारक पार्किंग तसेच तळमजला अधिक तीन असे चार मजल्यांचे करण्याचा बैठकीत निर्णय घेण्यात आला. तळ मजल्यावर महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा पुतळा, त्यांचा जीवनपट दर्शविणारे म्युरल्स किंवा चित्रमय व्यवस्था,वरील मजल्यावर त्यांच्या जीवनातील

प्रसंग, कार्याची माहिती स्क्रीनवर दृकश्राव्य स्वरुपात दर्शविण्याची यंत्रणा तसेच त्यांचे लेखन साहित्य त्याशिवाय वरील मजल्यावर मुली, महिलांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्था अशी व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देश पवार यांनी दिले आहेत.

नागपूर-धामणा स्फोट

काल नागपूर अमरावती रोडवरील धामणा परिसरातील चामुंडी एक्सप्लोसिव्ह कंपनीत स्फोट होऊन ६ निरपराध कामगारांचा जीव गेला. सहापैकी पाच युवती असून एका पुरुषाचा मृतांमध्ये समावेश आहे. आज केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी  या स्फोटामध्ये जीव गमावणाऱ्या मृतकांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. मृतकांचे कुटुंबीय व गावकऱ्यांसोबत देखील गडकरी यांनी संवाद साधला आणि आर्थिक मदत लवकरात लवकर मिळण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. त्याचबरोबर घटनास्थळाची पाहणी करून भविष्यात अशाप्रकारची घटना घडूच नये किंवा घडली तर त्यावर तातडीने नियंत्रण मिळविता येईल, यासाठी आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देशही अधिकाऱ्यांना दिले. दरम्यान, या कंपनीत झालेल्या स्फोटाची सखोल चौकशी करून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २५ लाख रुपयांची मदत दिली पाहिजे तसेच जखमींच्या उपचाराचा सर्व खर्च करून प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष नाना गावंडे यांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल असतानाही चामुंडा कंपनीचा मालक जय खेमका आणि व्यवस्थापक सागर देशमुख यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे.

चारा डेपो

राज्यातील अनेक भागात पावसाचे आगमन झाले असले, तरी अनेक विभागात अद्यापही समाधानकारक पावसाचे प्रमाण झाले नसल्याने राज्यातील 1245 महसुली मंडळात चारा डेपो उभारण्यास शासनानं  परवानगी दिल्याची माहिती राज्याचे महसूल तथा पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे. शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून जनावरांचे पालन करताना कोणत्याही अडचणी येणार नाहीत असा

विश्वास त्यांनी व्यक्त केला. सध्या राज्यात 512.58 लाख मॅट्रिक टन हिरवा चारा तर 144.55 लाख मॅट्रिक टन सुका चारा उपलब्ध आहे. हा चारा जून महिनाभर पुरेल असा अंदाज शासनाकडून व्यक्त केला आहे. चाऱ्याचे प्रमाण कमी होत असताना शेतकऱ्यांना आणि पशुपालकांना जनावरांचे पालन पोषण करताना येणाऱ्या अडचणी कमी व्हाव्यात म्हणून मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी 31 ऑगस्ट पर्यंत दुष्काळ सदृष्य भागात चारा डेपो उभारून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी केली होती. नुकत्याच पार पडलेल्या पर्जन्यमान आढावा बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याला मान्यता दिली आहे.

रुपाली चाकणकर

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आज 'आरोग्य वारी'चा आढावा घेतला. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीनं महिला वारकऱ्यांच्या सुरक्षा आणि स्वच्छतेसाठी राबविण्यात येणाऱ्या आरोग्य वारीचं हे तिसरं वर्ष आहे. आरोग्य वारीची योग्य अंमलबजावणी व्हावी, यासाठी रुपाली चाकणकर यांनी आज ऑनलाईन बैठकीद्वारे आढावा घेतला. 'पुणे, सातारा, सोलापूर तिन्ही जिल्ह्याच्या प्रशासनानं वारकऱ्यांच्या स्वागताची तयारी करत सर्व सोयी सुविधांची चांगली तयारी केली आहे. हिरकणी कक्ष, स्वच्छतागृह, स्नानगृह, सॅनिटरी नॅपकिन्स वेंडींग बर्निंग मशिन्स सोबतच आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्त्रीरोग तज्ञ, प्राथमिक तपासणी पथक याची सज्जता आहे. पोलिसांनी निर्भया पथक, दामिनी पथक, दुचाकी वरून गस्त घालणाऱ्या महिला पोलिस असा फोर्स तैनात केला आहे. विठूरायाच्या ओढीनं चाललेल्या वारकऱ्यांना स्वच्छ, सुरक्षित प्रवास करता आला तर ती आपल्याला पांडुरंगाच्या चरणी सेवा अर्पण करण्याची संधी आहे, असं सांगत सर्व प्रशासन, पोलीस यांना सज्ज राहण्याच्या सूचना चाकणकर यांनी प्रशासनाला केल्या आहेत.

नागरी सेवा पूर्व परीक्षा

केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा (UPSC) २०२४ ही दि. १६ जून २०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाने यापूर्वीच निर्गमित केलेल्या ३० ऑक्टोबर २०२३ रोजीच्या लेखी सूचनेनुसार परीक्षार्थींनी

आपल्या नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरु होण्यापूर्वी अर्धा तास  अगोदर हजर राहण अनिवार्य केलं आहे.

योग दिन

जागतिक योग दिनाचे औचित्यसाधून नागपूर महानगरपालिकेच्या वतीनं येत्या शुक्रवार 21 जून रोजी धंतोली स्थित यशवंत स्टेडियम इथं  सकाळी 6.00 वाजता सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमाचं आयोजन कर ण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मनपाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. जागतिक योग दिवसानिमित्ताने आयोजित कार्यक्रमाची तयारी, स्वरूप आणि विविध संस्थांच्या सूचना जाणून घेण्याच्या दृष्टीनं आज नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. तर याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने  केंद्रीय संचार ब्यूरो क्षेत्रीय कार्यालय नागपूर, योग विद्या धाम भंडारा शाखा व असर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानं आज प्रोटोकॉल वर्गाचा उद्घाटन सोहळा भंडारा इथं  स्प्रिंग डेल शाळेच्या पटांगणात संपन्न झाला.

हज

पाच दिवसांच्या वार्षिक हज यात्रेला आजपासून सुरुवात झाली. या यात्रेसाठी जगभरातून सुमारे २० लाख यात्रेकरू सौदी अरेबियात एकत्र जमले आहेत. यात एक लाख ७५ हजार भारतीय यात्रेकरूंचाही समावेश आहे आणि यातले १ लाख ४० हजार २० यात्रेकरू भारतीय हज समितीच्या माध्यमातून यात्रेसाठी गेले आहेत. या वर्षी पाच हजार भारतीय महिला यात्रेकरू मेहराम, अर्थात पुरुष सोबत्याविना हज करणार आहेत. भारतीय यात्रेकरूंच्या सोयीसाठी हज सुविधा हे मोबाइल ॲप उपलब्ध करून देण्यात आलं आहे.

मेळघाट कुपोषण चौकशी

मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू व मातामृत्यू या आरोग्यविषयक प्रश्नांना कायमस्वरुपी सोडविण्यासाठी प्रशासनाकडून विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. धारणी तालुक्यातील गर्भवती महिला व तिच्या बालकाचा मृत्यू या घटनेसंबंधी विशेष चौकशी पथकाकडून चौकशी केल्या जात असून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई

करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त डॉ.निधी पाण्डेय यांनी दिले आहेत. अशा प्रकारची दुर्दैवी घटना यापुढे घडू नये म्हणून आरोग्य विभागानं सर्व आरोग्य केंद्र तसेच उपजिल्हा रुग्णालयात आवश्यक त्या सर्व वैद्यकीय सेवा-सुविधा उपलब्ध ठेवाव्यात, अशा स्पष्ट सूचनाही त्यांनी सदर बैठकीत दिल्या. डॉ. पाण्डेय म्हणाल्या की, गत काही दिवसापासून मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू व मातामृत्यू या विषयासंबंधी अनेक बातम्या वृत्तपत्रातून प्रसिध्द झाल्या आहेत. त्यानुषंगाने परिस्थितीचे गांर्भीय समजून आवश्यक उपाययोजनांसाठी करण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यकतेनुसार जिल्हा वार्षिक योजना, तसेच शक्य असेल तिथं सीएसआर फंडातू निधीची तरतूद करावी. तसेच आवश्यक वैद्यकीय उपचार साहित्यांच्या उपलब्धतेसाठी शासनाकडे मागणीचे प्रस्ताव सादर करण्यात यावेत असे निर्देश डॉ.पाण्डेय यांनी झालेल्या बैठकीत दिले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर

आज नागपुरातील सेमिनरी हिल्स येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय, भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण कार्यालयाच्या परिसरात स्थापित केल्या गेलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षणनाचे अतिरिक्त महासंचालक व मध्य विभागाचे विभाग प्रमुख दिनेश गणवीर यांचा हस्ते करण्यात आलं.पुतळ्याच्या अनावरणाप्रसंगी दिनेश गणवीर यांनी बाबासाहेबांच्या जीवन चारित्र्यावर प्रकाश टाकला. आंबेडकरांनी समाजातील सर्व घटकांसाठी केलेलं कार्य न विसरण्यासारखं आहे. त्यांनी दिलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या विचारांची आज समाजाला आणि देशाला गरज आहे, असंही ते म्हणाले.

नवीन शिक्षण धोरण

घटनेतील जी मार्गदर्शक तत्वे आहेत तेच शालेय अभ्यासक्रमा शिकवावी अशी मागणी फेडरेशन ऑफ ऑर्गनायझेशन फॉर सोशल जस्टिस, सेक्युलरिझम अँड डेमोक्रेसी चे समन्वयक डॉ. सुखदेव थोरात यांनी केली आहे. यासंदर्भात नागपुरात आयोजित पत्रपरिषदेत ते बोलत होते. नवीन शैक्षणिक धोरण 2020 नुसार महाराष्ट्र सरकारने अभ्यासक्रम किंवा पाठ्यपुस्तक आराखडा तयार केला आहे. युवकांना एक सुजाण नागरिक बनवण्यासाठी तर्कशुद्ध आणि वैज्ञानिक ज्ञान,

नैतिक मूल्य देणे; रोजगार क्षमता वाढविण्यासाठी कौशल्य प्रदान करणे, ही उद्दिष्टे शालेय अभ्यासक्रमात साध्य झाली पहिजे असं डॉ.थोरात यांनी यावेळी सांगितलं.

‘जनसंवादातून सुशासनाकडे

दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागात अधिकाऱ्यांना वेळोवेळी जाणे शक्य होत नाही. नागरिकांनाही जिल्हास्थळी येणे अवघड असते. त्यामुळे नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचं निराकरण करण्याच्या हेतूने प्रभारी जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी ‘जनसंवादातून सुशासनाकडे’ हा उपक्रम सुरु केला आहे. त्याअनुषंगाने भाकरे यांनी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे नागरिकांशी संवाद साधून समस्या सोडविण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

विशेष कृती योजना

कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया आधारित पीक पध्दतीस चालना देवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी विशेष कृती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावे, असं आवाहन कृषि विभागाकडून प्रसिध्दी पत्रकाद्वारे करण्यात आलं आहे.

******